# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १५/०९/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. नरखेड** :– दिनांक ०१/०७/२०२२ ते दिनांक १३/०९/२०२२ चे ०१:३० वा. ते १७.३० वा. चे सुमारास आरोपी नामे– अनिल सुरेश टेकाडे वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र १२ नरखेड याने फिर्यादी यांची वय १४ वर्षीय पीडित अल्पवयीन मुलगी हिच्यासोबत तिचे अज्ञानपणाचा गैरफायदा घेवुन तिचे सोबत शारीरिक संबध प्रस्थापीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(१)(२)(प)(द)भादंवि. सहकलम ४ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच सहकलम ३(१)(२)(w)(i)(ii)3(२)(अ) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास श्री नागेश जाधव पोलीस उपविभागीय अधिकारी काटोल विभाग काटोल हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०१ कि मी अंतरावरील खापरखेडा येथे दिनांक २४/०८/२०२२ चे १०.०० ते २५/०८/२०२२ चे १०.१५ वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे– विनोद आनंदराव मून, वय ६० वर्षे, रा. हिंदुस्तान कॉलनी यांना फोन करून 'तुमचे पार्सल आले आहे, त्याकरिता तुम्हाला रजिस्टेशन फी ५ रू भरावे लागेल' असे सांगून आरोपीने फिर्यादीचा बॅक खात्यातून १,११,०००/–रू. काढून घेत फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(ड)माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मूंडे ९९७००९४७०९ हे करीत आहे.

### दुखापत

१) **पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत १२ कि मी अंतरावरील मेंढला येथे दिनांक १३/०९/२०२२ चे २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– भोजराज रामकृष्णजी चरपे, वय २३ वर्ष, रा. मेंढला ता.नरखेड व आरोपी नामे– विनोद रामकृष्णजी चरपे, रा. मेंढला ता. नरखेड हे दोघेही सख्खे भाऊ असुन एकाच घरात राहतात. आरोपी हा नेहमी दारू पिण्याचा सवयीचा असुन फिर्यादी हा आपले घरी आला असता आरोपीने जुन्या वादाचा कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करून कॉलर पकडुन घराचे लोखंडी गेटवर धक्का दिला असता फिर्यादीचे डोक्याला व होटाला मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धोंडे मो.क्र. ८६०५३२२३२२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :– अंतर्गत डोहनघाट येथे दिनांक १४/०९/२०२२ चे १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामेश्वर दादूजी गायकवाड वय ३६ वर्ष, रा. वाकोडी याची शेती मौजा डोहनघाट शिवारात असुन त्या शेतामध्ये पराटीचे झाडे आहे. त्यामध्ये आरोपी नामे– रामकृष्णा माधव लोहणकर, वय ४० वर्ष, रा. वाकोडी याची गाय आली व गायीने पराटी पीक खाल्याने नुकसान केले. फिर्यादी याने त्या गायीला बांधुन ठेवले याच कारणावरून यातील आरोपीने फिर्यादी ला 'माझी गाय का बांधली' असे हटकुन हातातील काठीने फिर्यादीचे छातीवर व उजव्या हाताचे दंडावर मारूण जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करूण झगडा–भांडण करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास जिपोउपनि लोन्दे मो.नं. ९८५०९००७६८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**